Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 4, July-Aug – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 02/08/2020 Accepted on : 12/08/2020 Publication Date: 31/08/2020

आधुनिक तंत्रज्ञानातील घटकांचा द्रष्टीबाधित विध्यार्थांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणारा परिणाम : एक अभ्यास

[1]माधव गणपतराव गोरे, [2] डॉ. जी टी खुरपे,
[1] पी.एचडी संधोधक विध्यार्थी, शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
[2] प्राचार्य, जयक्रांती अध्यापक महाविधालय, जिल्हा लातूर, महाराष्ट्र भारत

१.१ प्रस्तावना :

शिक्षण प्रक्रियेमध्ये दोन प्रकारचे विध्यार्थी आढळतात एक सामान्य आणि एक अपसामान्य म्हणजेच त्यांना अकार्यक्षम किंवा अध्ययन अकार्यक्षम असे संबोधले जाते साधारणपणे जेंव्हा सामान्य आणि असामान्य विद्यार्थ्याची तुलना हि वेगवेगळ्या स्तरावर करता येते अध्ययन अकार्यक्षम विध्यार्थी हे अनोपचारिक शिक्षण प्रकियेत आढळत असतात. तरीही त्यांचे अध्ययन सापेक्षपणे करण्यासाठी व वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत होते आधुनिक तंत्रज्ञानामुळे विध्यार्थ्याची अध्ययन कार्यक्षमता वाढते. विशेष बालकामधील द्रष्टीदोष असणार्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांना त्यातील जाणवणाऱ्या समस्या ह्या आधुनिक तंत्रज्ञानातील उपलब्ध साहित्यामुळे त्यांना प्रत्यक्षरित्या अध्ययनास मदत मिळते व आधुनिक तंत्रज्ञानातील साधने हाताळताना द्रष्टीबाधित विध्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीत वाढ होते कि कमतरता याची मीमांसा करणे गरजेचे असते म्हणून सदरील समस्येवर शोध घेण्याचा प्रयत्न केला असून सदरील संशोधन हे आधुनिक तंत्रज्ञानातील द्रष्टीबाधित विध्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीवर होणारा परिणामाचा अभ्यास केला असून त्यातील काही मुख्य घटक सदरील संधोधन पेपरमध्ये दिलेले आहेत.

१.२ समस्या विधान :

आधुनिक तंत्रज्ञानातील घटकांचा द्रष्टीबाधित विध्यार्थांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणारा परिणाम – एक अभ्यास.

१.३ सशोधनाची उदिष्टे :

१. आधुनिक तंत्रज्ञानातील घटकांचा द्रष्टीबाधित विद्यार्थी संदर्भात अभ्यास करणे.
२. आधुनिक तंत्रज्ञानातील घटकांचा द्रष्टीबाधित विध्यार्थांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणारा परिणामाचा अभ्यास करणे.

१.४ संधोधन परिकल्पना :

आधुनिक तंत्रज्ञानातील घटकांचा द्रष्टीबाधित विध्यार्थांच्या शैक्षणिक प्रगतीवर सार्थ परिणाम होत नाही.

१.५ संशोधन साधन :

सरतील संधोधानामध्ये स्वनिर्मित पदनिश्चयन श्रेणीचा वापर करण्यात आला आहे.

१.६ संधोधन पद्धती :

१. सदरील संशोधनात वर्णनात्मक व सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.
२. सदरील संशोधनात लातूर जिल्ह्यातील ३० द्रष्टीबाधित विध्यार्थांची निवास करण्यात आली आहे आणि त्यांना दहा विधाने विचारण्यात आली.
३. सदरील संशोधनात लातूर जिल्ह्यातील एकाच द्रष्टीबाधित शाळेचा विचार करण्यात आला आहे.

१.७ संशोधनाच्या मर्यादा :

१. सदरील संशोधनात लातूर जिल्ह्यातील एकाच द्रष्टीबाधित शाळेपुरते मर्यादित आहे.
२. सदरील संशोधन हे एकाच शाळेतील ३० विध्यार्थाना पुरते मर्यादित आहे.

१.८ संशोधनाची गरज :

द्रष्टीबाधितांचे शिक्षण हि अत्यंत किचकट प्रक्रिया आहे त्यांच्या अध्ययन प्रक्रियेत सातत्याने विशेष साहित्य साधने, द्विमतीय व त्रिमितीय प्रतिकृती प्रत्यक्ष अनुभव अर्थात प्रात्यक्षिक घटक वापरण्याची नितांत आवश्यकता आहे. अलीकडील

काळात राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष शिक्षणास सहाय्यक आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित बरेच इलेक्ट्रोनिक उपकरणे, साधने व सोफ्टवेअर विकसित करण्यात आले आहेत. या बाबीचा वापर करून द्रष्टीबाधितांची शैक्षणिक प्रक्रिया अधिक गुणवत्तापूर्ण पध्दतीने राबविता येणे शक्य आहे का ? याविषयी विश्लेश्नात्मक अभ्यास होणे अभिप्रेत आहे अदा. अलीकडील काळात उदयास आलेल्या ब्रेली या मशीनमुळे मोठ्या प्रमाणात ब्रेल लिपी सामग्रीची निर्मिती होत आहे. याचा लाभ कितपत होत आहे या परीस्थितीचा अभ्यास होने अपेक्षित आहे. RBD – Refreshable Braille Display स्क्रीन डीस्क्रायबर इ. सोफ्टवेअरच्या विकासामुळे द्रष्टीबाधितांसाठी लेखन समस्या बर्यापैकी दूर झाली आहे. अशा प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञानातील घटकांचा द्रष्टीबाधित विध्यार्थांच्या शैक्षणिक प्रगतीत सकारात्मक परिणाम जाणवतो याचाही अभ्यास होणे गरजेचे आहे.

१.९ संशोधन विश्लेषण :

सदरील संशोधनात **पदनिश्चयन श्रेणीचा वापर केला असल्यामुळे त्या श्रेणीचे विश्लेषण टी परिक्षीका मार्फत करण्यात आले आहे.**

घटक	चाचणी	संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	मध्यामानातील फरक
द्रष्टीबाधित विद्यार्थी	पूर्व चाचणी	३०	१५.५३	२.२०	०.७
	उत्तर चाचणी	३०	१९.०५	२.२७	

१.१० संशोधनातील निष्कर्ष :

१. द्रष्टीबाधित विध्यार्थांच्या शैक्षणिक प्रगतीवर आधुनिक तंत्रज्ञानातील अनुउपलब्ध साहित्याचा सार्थ परिणाम होतो.
२. द्रष्टीबाधित विध्यार्थांच्या मिळणार्या शैक्षणिक व तंत्रज्ञानातील सुविधा ह्या कमी प्रमाणात उपलब्ध असतात.
३. द्रष्टीबाधित विध्यार्थांच्या त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानातील साहित्यावर अवलंबून राहावे लागते.
४. द्रष्टीबाधित विध्यार्थांना त्यांच्या अध्ययनातील विविध प्रत्यक्ष अडचणीचे प्रमाण खूप जास्त असल्याचे आढळून आले आहे.
५. द्रष्टीबाधित विध्यार्थांच्या अध्ययनासाठी शाशकीय योजनातील पुरवठ्याचे प्रमाण हे कमी असल्याचे आढळून आले आहे.

१.११ संशोधनाच्या शिफाराशी :

१. शासनाने ठरविलेल्या विविध योजना ह्या पूर्ण स्वरुपात उपलब्ध करून घ्याव्यात.
२. आधुनिक शैक्षणिक साहित्याची उपलब्धता हि पूर्ण स्वरुपात उपलब्ध करून घ्यावी.
३. आधुनिक तंत्रज्ञान वापरासाठी पात्र शिक्षकाची भारती करावी.

संदर्भग्रंथ सूची :

१ पाटील प्रियज मुतुज (२०११), मल्टीमिडिया: अट इंनोवेटीव टीचिंग टूल, शिक्षण तरंग.
२ सदावर्ते उज्वला (२०११), माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या अध्यापनासाठी नावोपक्रमाचा परिणामकारक उपयोग: एक अभ्यास, शिक्षण तरंग
३ उपासनी ना के (१९९६) नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन पुणे
४ दांडेकर वा ना (१९९४) शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, विद्या प्रकाशन पुणे
५ डॉ जोशी देवेंद्र आणि सदावर्ते यु के (२००७) शैक्षणिक संशोधन व संख्याशास्त्र, आदित्य प्रकाशन, नांदेड
६ चा प कदम (२००५) शैक्षणिक संख्याशास्त्र, नूतन प्रकाशन, पुणे
७ के यु घोरमोडे (२००८), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, विद्या प्रकाशन, नागपूर
८ डॉ वी रा भिंताडे (१९८८), शैक्षणिक संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे